माहितीचा अधिकार

"निर्गमित"

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, अमरावती**
**माहितीचा अधिकार अधिनियम, 2005 मधील कलम 18 अन्वये**
**दाखल झालेली तक्रार**

**रामाआ - तक्रार क्र. अम- 216/2020**

तक्रारकर्ता - श्री.शेख अब्दुल खलील शेख मुस्तफा.
मु.पो.अंबर लॉन, प्रभात नगर, भोसा रोड, राजु किराणा जवळ, यवतमाळ, ता.जि.यवतमाळ.

**विरुध्द**

प्रथम अपिलीय अधिकारी तथा अप्पर पोलीस अधीक्षक, यवतमाळ, ता.जि.यवतमाळ.
जन माहिती अधिकारी तथा उप अधीक्षक मुख्यालय, यवतमाळ, ता.जि.यवतमाळ.

**तक्रार सुनावणी दिनांक - 01/02/2021**

तक्रारकर्ता यांनी दि.29/10/2020 रोजी आयोगाचे स्तरावर कलम 18 (1)(ख) व (च) अन्वये तक्रार दाखल करुन, दि.28/09/2020 रोजी दाखल केलेल्या माहिती अर्जावर जन माहिती अधिकारी यांनी सदर माहिती सार्वजनिक व्यापक जनहित साध्य करणारी असून देखील कामकाजाच्या किंवा हितसंबंधाशी काहीही संबंध नाही, त्यामुळे माहिती अधिकार अधिनियम, 2005 चे कलम 8(1) (ञ) नुसार नाकारण्यात येत आहे, असे बेकायदेशीर नियमबाह्य पत्र व्यवहार करुन अर्ज फेटाळला. म्हणुन संबंधित दोषी अधिकाऱ्यांविरुध्द दंडात्मक/शास्तीची कारवाई करावी व तक्रारकर्ता यांना नुकसान भरपाई द्यावी असे निवेदन केले आहे.

प्रस्तुत तक्रारीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना सुनावणीसंबंधी ई-मेल द्वारे सुचनापत्र पाठवून त्यांचा लेखी व सविस्तर खुलासा सादर करण्याबाबत तसेच बचावाची संधी देण्याच्या दृष्टीकोणातून दि.01/02/2021 रोजी ऑनलाईन सुनावणीकरीता बोलावले होते. त्यानुसार सुनावणीस तक्रारकर्ता हजर आहेत. विद्यमान प्रथम अपिलीय अधिकारी श्री.डॉ.के.ए.धरणे, अप्पर पोलीस अधिक्षक हे हजर आहेत. विद्यमान व तत्कालीन जन माहिती अधिकारी श्रीम.माधुरी बाविस्कर, पोलीस उप अधीक्षक (मुख्या.) ह्या हजर आहेत.

प्रकरणाची वस्तुस्थिती तपासली असता, केंद्रीय माहितीचा अधिकार अधिनियम, 2005 चे कलम 6(1) नूसार अपीलार्थी यांनी दि.28/09/2020 रोजी **जोडपत्र-अ** या नमुन्यात जन माहिती अधिकारी यांचेकडे रीतसर अर्ज दाखल करुन, पोलीस अधीक्षक, यवतमाळ यांचे पत्र क्र.जिविशा/पंट्रोलपंप/5458/2019 दि.03/12/2019 रोजीच्या पत्र अहवालाच्या मुळ नस्तीच्या टिप्पण उता-याच्या छायांकीत प्रतीबाबतची माहिती मागितली होती. तथापि जन माहिती अधिकारी यांनी ही माहिती सार्वजनिक हितसंबंधित नसल्यामुळे नाकारण्यात येत आहे असा पत्रव्यवहार करुन माहिती अर्ज फेटाळला होता. त्यामुळे अपिलार्थीने या अधिनियमाचे कलम 18 (1)(ख) व (च) नुसार थेट तक्रार दाखल केल्याचे दिसून येत आहे.

उत्तरवादी यांचा तोंडी/लेखी खुलासा व आजच्या गुगल मीट ॲपवरील ऑनलाईन सुनावणीमधुन असे निदर्शनास येते की, अपिलार्थी यांनी दि.28/09/2020 रोजीच्या माहिती अर्जान्वये, पोलीस अधीक्षक, यवतमाळ यांचे पत्र क्र.जिविशा/पंट्रोलपंप/5458/2019 दि.03/12/2019 रोजीच्या पत्र अहवालाच्या मुळ नस्तीच्या टिप्पण उता-याच्या छायांकीत प्रतीबाबतची माहिती मागितली होती. तथापि संबंधित जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीच्या माहिती अर्जाचे अवलोकन केले असता, अपिलार्थीने मागितलेली माहिती कोणत्याही कामकाजाशी किंवा हितसंबंधाशी काही संबंध नाही, त्यामुळे माहितीच्या अधिनियमाचे कलम 8(1) (ञ) अन्वये नाकारण्यात येत आहे असे दि.21/10/2020 रोजीच्या पत्रान्वये अपिलार्थीस कळविले असल्याचा खुलासा विद्यमान जन माहिती अधिकारी यांनी सुनावणी दरम्यान केला आहे. तसेच आजच्या ऑनलाईन सुनावणीमधुन असे निदर्शनास आले की, तक्रारदार यांनी मागणी केलेली माहिती ही

सार्वजनिक व्यापक हिताची नसल्याचा जन माहिती अधिकारी यांनी निष्कर्ष काढला होता. त्यानुसार त्यांनी आबंधीत माहिती म्हणुन या अधिनियमाचे कलम 8(1)(ञ) या तरतुदीचा वापर करुन नाकारली आहे. या पार्श्वभूमीवर माहितीचा विषय काय होता/आहे हे पाहणे आवश्यक आहे. यवतमाळ जिल्ह्याचे तत्कालीन जिल्हा पोलीस अधीक्षक हे त्यांचे पत्नीचे नावे मौजा नायगांव ता.वणी, जि.यवतमाळ येथे पेट्रोलपंप मंजुर करुन घेतात व त्यासाठी ते तेथे जमीन खरेदी करतात. ते तमिळनाडू या दक्षिणात्य राज्यातील मुळ रहिवाशी असतात. महाराष्ट्रातील जमीन खरेदी करतांना, ते येथे भूमीधारी/भुमीस्वामी असणे आवश्यकच नव्हे तर अनिवार्य असल्याचीबाब येथील जमीन विषयक कायदे महाराष्ट्र महसूल सहिंता सांगते व त्याआधारेच महसूल विभागाने शेतजमीनीचे फेरफार करणे बंधनकारक आहे. परंतु प्रस्तुत प्रकरणी तसे झाल्याचे दिसून येत नाही. तसेच जिल्हा पोलीस अधीक्षक कार्यालयाचे स्तरावर पेट्रोल पंप मंजुरीसाठी याबाबत नाहरकत मागितली जाते. जिल्हा पोलीस अधीक्षक या पदावरील व्यक्ती असल्यामुळे व स्वत:च्याच पत्नीला स्वत:च्या स्वाक्षरीने ते नाहरकत प्रमाणपत्र वितरीत करतात म्हणजेच सहजपणे नाहरकत/परवानगी त्यांना मिळते. जेव्हा सामान्य नागरिकांना याचा कानोसा लागतो. ते यातील मर्म जाणुन घेण्याचा प्रयत्न करतात. मग अपिलार्थी सारखे जागरुक नागरिक माहितीचा अर्ज दाखल करुन माहितीची मागणी करतात. सदर माहिती कोणतेही सार्वजनिक व्यापकहित साध्य करणारी नाही, म्हणुन केंद्रीय माहितीचा अधिकार अधिनियम, 2005 चे कलम 8(1) (ञ) च्या तरतुदीनुसार ती नाकारण्यात येते. या पार्श्वभुमीवर प्रस्तुत तक्रार अर्ज दाखल होतो. आता आपण केंद्रीय माहितीचा अधिकार अधिनियम, 2005 चे कलम 8(1) (ञ) ची नेमकी काय तरतुद आहे हे पाहू.

कलम ८(१)(ञ)- 'जी माहिती प्रकट करणे व्यापक लोकहिताच्या दृष्टीने आवश्यक आहे अशी, यथास्थिती, केंद्रीय जन माहिती अधिका-याची, राज्य जन माहिती अधिका-याची किंवा अपिलीय अधिका-याची खात्री पटली असेल, ती खेरीज करुन, जी प्रगट करण्याचा कोणताही सार्वजनिक कामकाजाशी किंवा हितसंबंधाशी काहीही संबंध नाही किंवा जी व्यक्ती खाजगी बाबतीत आंगतूक हस्तक्षेप करिल, अशी वैयक्तीक तपशीलासंबंधातील माहिती :

परंतु, जी माहिती संसंदेला किंवा राज्य विधीमंडळाला देण्यास नकार देता येणार नाही, ती माहिती कोणत्याही व्यक्तीला देण्यासही नकार देता येणार नाही. तसेच केंद्रीय माहितीचा अधिकार अधिनियम, 2005 चे कलम 24(4) चे परंतुकानुसार, "परंतु, भ्रष्टाचार व मानवी हक्काचे उल्लंघन यांच्या आरोपाशी संबंधित माहिती, या पोटकलमान्वये वगळण्यात येणार नाही',अशी तरतुद आहे. या पार्श्वभुमीवर पोलीस अधीक्षक कार्यालयाने कलम 8(1) (ञ) या तरतुदीचा वापर करुन तक्रारदाराने मागणी केलेली माहिती नाकारली आहे. वरिल कायद्याच्या तरतुदीचे सुक्ष्म अवलोकन केले असता असे निदर्शनास येते की, (1) माहितीच्या मागणीमध्ये सार्वजनिक व्यापक हित असले पाहिजे, (2) मागितलेल्या माहितीचे सार्वजनिक कामकाजाशी संबंध असला पाहिजे, माहिती मागविणे खाजगीबाबतीत आगंतुक लुडबुड असू नये, (4) अशी माहिती विधीमंडळाने मागितली तर नकार न देता येण्यासारखी असेल तर ती सामान्य नागरिकांना नाकारता येणार नाही अशी असली पाहिजे, (5) अशा माहितीमध्ये गैरप्रकार, भ्रष्टाचाराचा मुद्दा गुंतलेला असला पाहिजे. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीने मागणी केलेली माहिती ही कोणतेही सार्वजनिक व्यापक जनहित साध्य होत नाही या एकमेव कारणासाठी नाकारली आहे. वास्तविक, दैनंदिन कामकाजाच्या प्रक्रियेतून हि माहिती सार्वजनिक प्राधिकरणाच्या कार्यालयात तयार झालेली होती व ती या अधिनियमाचे कलम 2(च) च्या व्याख्येत बसणारी होती. त्यामध्ये कोणतेही गोपनियता नव्हती व ते एक सार्वजनिक दस्तावेज होते. एखादा अर्ज करुन नाहरकत मागणे, परवानगी मागणे हि माहिती खाजगी स्वरुपाची राहत नाही तर सार्वजनिक ठरते. सदर माहिती ही तक्रारदाराच्या म्हणण्याप्रमाणे सदर अभिलेख हे जमीनीचे कायद्याच्या तरतुदीचा भंग करुन पदाचा गैरवापर करुन, स्थानिकांचे हक्क डावलून, जमीनीच्या खरेदीपोटी जबर किम्मत मोजुन खरेदी केलेली असल्यामुळे त्यात सार्वजनिक व्यापक हित गुंतलेले आहे. तसेच या नाहरकत/परवानगीला गैरप्रकाराची, भ्रष्टाचाराची झालर चढलेली आहे असे स्पष्ट होत आहे. म्हणुन ती सार्वजनिक व्यापकहित साध्य करणारी व देण्या योग्य आहे. तसेच या नाहरकत/परवानगीला गैरप्रकाराची, भ्रष्टाचाराची झालर चढलेली आहे असे तक्रादाराच्या निवेदनानुसार स्पष्ट होत आहे. तसेच सदर माहिती खाजगी नाही. हि माहिती जर विधीमंडळाने मागितली असती तर ती नाकारण्यासारखी नव्हती व नाही. तरीदेखील जन माहिती अधिकारी यांनी फक्त वरिष्ठांच्या दबावापोटी सार्वजनिक व्यापकहित साध्य होत नाही असे मत बनवून नाकारली आहे. परंतु त्याची पार्श्वभुमी तपासली असता सदर प्रकरणात तत्कालीन जिल्हा पोलीस अधीक्षक यवतमाळ, यांच्या पत्नीच्या नावे मौजा नायगांव ता.वणी, जि.यवतमाळ येथे पेट्रोलपंप उभारण्यासाठी मागितलेले पोलीस विभागाचे या नाहरकत प्रमाणपत्र, टिप्पणी,नोटशीत इत्यादी माहिती मागितली असता ती गोपणीय ठरवून, सार्वजनिक व्यापक हित साध्य न करणारी असे मत बनवून नाकारली आहे. हि बाब गैरकायदेशीर असून आयोग याबाबत गंभीर दखल घेत आहे. केंद्रीय माहितीचा अधिकार अधिनियम, 2005 च्या प्रस्तावणे मध्ये स्पष्ट नमूद आहे की, या कायद्याची निर्मीती प्रत्येक

सार्वजनिक प्राधिकरणामध्ये अधिकाधिक पारदर्शकता व उत्तरदायित्व निर्माण करणे व जनतेप्रती प्रशासनाला जबाबदेयी निश्चीत करुन सार्वजनिक प्राधिकरणात होणा-या भ्रष्टाचाराला आळा घालने असा आहे. सबब, केंद्रीय माहितीचा अधिकार अधिनियम, 2005 चे कलम 19(10) नूसार खालीलप्रमाणे आदेश पारित करण्यात येतो.

**आदेश**

1. तक्रारदाराची तक्रार मंजुर करण्यात येते.

2. तक्रारदार-माहिती अर्जदाराने मागितलेली माहिती ही देण्यासारखी असतानाही ती सार्वजनिक व्यापक हित साध्य करत नाही म्हणून बेकायदेशीरपणे नाकारली असली तरीही उपरनिर्दिष्ट विवेचनानुसार ती देय्य ठरत असल्यामुळे जन माहिती अधिका-याने तत्काळ माहितीचे विनाशुल्क प्रदान करावी व अनुपालन अहवाल आयोगास सादर करावा.

3. तक्रारदाराने मागितलेली माहिती देय्य ठरत असताना व ती सार्वजनिक व्यापक जनहित साध्य करणारी असतांना सुध्दा ती चुकीच्या कारणासाठी नाकारली. परिणामी तक्रारदारास नाहक त्रास सहन करावा लागला, आर्थिक नुकसान पोहचले. म्हणून कलम 19(8)(ख) नुसार ते नुकसान भरपाई मिळण्यास पात्र ठरतात. सबब, सार्वजनिक प्राधिकरण म्हणून जिल्हा पोलीस अधीक्षक, कार्यालय यवतमाळ यांनी 30 दिवसाचे आत तक्रारदार- माहिती अर्जदारास नुकसान भरपाई पोटी रु.10,000/- (अक्षरी रुपये दहा हजार फक्त) धनादेशाद्वारे अदा करुन तशा पोहचसह अनुपालन अहवाल तत्काळ आयोगास सादर करावा.

4. तक्रारदाराने मागितलेल्या व पोलीस अधीक्षक या सार्वजनिक प्राधिकरणातील नियुक्त जन माहिती अधिकारी यांनी नाकारलेल्या माहितीमध्ये गैरप्रकार भ्रष्टाचार व त्याचप्रमाणे पदाचा व अधिकाराचा दुरूपयोग असा मुद्या गुंतलेला असल्यामुळे अप्पर मुख्य सचिव, गृहविभाग मंत्रालय, मुंबई-32 यांनी सदर प्रकरणी विशेष चौकशी करावी व त्यानुसार पुढील कार्यवाही करावी अशी केंद्रीय माहितीचा अधिकार अधिनियम, 2005 चे कलम 25(5) व 19(8)(क) चे तरतुदीनुसार शिफारस करण्यात येते. सदर आदेश प्राप्त झाल्यापासून 1 महिन्याचे आत अशी चौकशी सुरु करून तसा अनुपालन अहवाल आयोगास सादर करावा.

5. केंद्रीय माहितीचा अधिकर अधिनियम, 2005 चे कलम 19(10) नुसार राज्य माहिती आयोगाने पारित केलेला प्रत्येक आदेश कलम 19(7) नुसार संबंधित सार्वजनिक प्राधिकरणावर निर्धारित वेळेत अनुपालन करण्यासाठी अंतिम व बंधनकारक आहे. जर पारित आदेशाचे अनुपालन न करून अवमान केल्यास प्राधिकरणाचे संबंधित जबाबदार अधिकाऱ्यांविरुद्ध भारतीय दंड संहिता, 1860 चे कलम 166 नुसार फौजदारी कार्यवाही करण्यात येईल याची नोंद घ्यावी.

वरिल प्रमाणे आदेशीत करुन कलम 18 (1) (ख) व (च) नुसार दाखल तक्रार निकाली काढण्यात येते.

राज्य माहिती आयोग यांचे कार्यालय, अमरावती विभाग, अमरावती
सत्यमेव जयते

(संभाजी सरकुंडे)
राज्य माहिती आयुक्त, अमरावती.

जा.क्र.अ.216/2020/1284/2020 दि. 22-Mar-2021 22/03/2021

प्रत :1. अपिल शाखा.
2. अप्पर मुख्य सचिव, गृहविभाग मंत्रालय विस्तार, मुंबई-32.
3. पोलीस महासंचालक, महराष्ट्र राज्य, मुंबई-32.
4. विषेश पोलीस महानिरिक्षक, अमरावती परिक्षेत्र, अमरावती.
5. जिल्हा पोलिस अधीक्षक यवतमाळ